AK.docx

# सोलापूर महनगरपालिका

दि.९/१०/२०१६

# प्रेसनोट

शहरातील मिरवणूक मार्ग  व प्रमुख मार्ग या मधील रस्ते दुरूस्ती स्वच्छता व मोकाट जनावरांचा बंदोबस्त या दृष्टीने दि.८ व ९ ऑक्टोंबर २०१६ रोजी धडक मोहिम हाती घेवून तसेच मोठयाप्रमाणात मनुष्य व यंत्रसामुग्री लावून कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

## १) रस्ते खड्डे दुरूस्ती मोहिम

विशेषत: पाऊस थांबल्यानंतर, शहरातील मिरवणूक मार्गावरील व मुख्य रस्त्यावरील पडलेले खड्डे दुरुस्ती करीता नगर अभियंता मुख्यकार्यालय व विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ अंतर्गत विशेष मोहिम हाती घेवून खालील प्रमाणे खड्डे दुरुस्ती करणेत आलेली आहे.

### देवीची मिरवणूक मार्ग

रुपाभवानी मंदीर ते बलिदान चौक मंगळवार पेठ पोलिस चौक ते मधला मारुती ते माणिक चौक ते विजापूर वेस ते पंचकट्टा ते रिपन हॉल ते डॉ.आंबेडकर चौक ते चार पुतळा ते शमीचे झाड

वरील देवी मिरवणूक मार्गावरील खड्डे दुरूस्ती ही प्रिमिक्सने करणेत आलेली आहे.प्रामुख्याने या मार्गावरील सराफ कट्टा, पंचकट्टा या भागात काही अंशी पेव्हर फिनिशरने रस्त्याचा भाग दुरूस्त करणेत आलेला आहे.

### मोहरम पंजा मिरवणूक मार्ग

रंगा चौक ते भारतीय चौक ते बाराईमाम चौक ते विजापूर वेस ते माणिक चौक ते जूनी फौजदार चावडी मार्ग दत्त चौक ते आसार मैदान

वरील मोहरम पंजा मिरवणूक मार्गावरील खड्डे दुरुस्ती ही प्रिमिक्सने करणेत आलेली आहे.

### धम्मचक्र प्रवर्तन दिन मिरवणूक मार्ग

सम्राट चौक ते शिवाजी चौक ते नवीवेस पोलिस चौकी ते सरस्वती चौक ते चार पुतळा ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक

वरील धम्मचक्र प्रवर्तन दिन मिरवणूक मार्गावरील खड्डे दुरुस्ती ही प्रिमिक्सने करणेत आलेली आहे

तसेच शहरातील मुख्य रस्त्यावरील व अंतर्गत रस्ते या वरील खड्डे दुरुस्ती ही **विभागीय कार्यालय क्र.१ ते ८** व मुख्यकार्यालय यांचे मार्फत करणेत आलेली आहे.

उपरोक्त खड्डे दुरुस्ती करीता सर्व विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ व मुख्य कार्यालयाकडील अशी एकूण ९४ इतकी मनुष्यबळाचा वापर करणेत आलेला आहे. तसेच प्रिमिक्स काढणे करीता कोल्ड मिक्स

मशिन व प्रिमिक्स वाहतुकी करीता ६ डंपरचा वापर करणेत आलेला आहे. याप्रमाणे विशेष मोहिमेची कार्यवाही शहरातील उर्वरित सर्व रस्त्यावरील खड्डे दुरुस्तीची कार्यवाही पुढील २ दिवसात चालू ठेवून पुर्ण करणे येत आहे. तसेच अंतर्गत रस्त्यामधील खड्डे दुरुस्ती हाती घेणे बाबत विभागीय कार्यालयांना आयुक्त वि.ना.काळम यांनी सक्त सूचना दिली आहे.

## २) मोकाट जनावरांचा बंदोबस्त

मनपा तर्फे जाहिर आवाहन केले नुसार नवरात्र, धम्मचक्र प्रवर्तल दिन, मोहरम सणानिमित्त शहरात साजरा होत असलेले सार्वजनिक सणानिमित्त रस्त्यवरील, तसेच पायी चालणा-या भक्तांना त्रास होवू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उपाय म्हणून दि.१/१०/२०१६ ते दि.१२/१०/२०१६ या दरम्यान जनावरे पाळणा-या मालकांना जाहिर आवाहनाव्दारे जनावरे मोकाट न सोडणे बाबत यापुर्वी सूचित करणेत आले आहे. तसेच मनपा तर्फे मोकाट जनावरांचा बंदोबस्ताची विशेष मोहिम राबविणेत येत असून आजतागायत साधारणत: ३० मोकाट जनावरे पकडून गोपालक संघाकडे सुपर्द करणेत आले आहे व योग्य बंदोबस्त करणेत येत आहे.

## ३) स्वच्छता मोहिम

उपरोक्त तीन्ही उत्सवाच्या मिरवणूक मार्गाचे विशेष स्वच्छता मोहिम हाती घेतलेली आहे. आज रोजी एकूण १२५० ठिकाणा पैकी ७३९ ठिकाणाहुन ७ रोड कंम्पॉक्टर , ६० घंटागाडी व ३ डंपर प्लेसर या वाहनाकडून २२५ टन कचरा उचलणेत आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने विजापूर रोड, एस.टी.स्टँड , रुपाभवानी ते सम्राट चौक ते पांजरापौळ चौक , रुपाभवानी ते बलिदान चौक , मधला मारुती , विजापूर वेस , रुपाभवानी ते प्रियांका चौक , दयानंद कॉलेज , अक्कलकोट नाका तसेच माणिक चौक ते दत्त चौक ते आसार मैदान येथून साफ सफाई करुन कचरा उचलणेत आलेला आहे. तसेच दसरा आणि मोहरम पुर्वी दोन दिवस या तिन्ही मार्गावरील तसेच शहरातील मुख्य मार्गावरील साफ सफाई करुन कचरा रोजचे रोज उचलणे बाबत संबंधीतांना मा.आयुक्त वि.ना.काळम यांनी सक्त सूचना दिलेल्या आहेत.

**सणासुदीच्या दिवसात पाणी पुरवठा सुरळीत राहणेच्या दृष्टीने देखील मनपा तर्फे नियोजन करणेत आले आहे.**

प्रति,

मा.संपादक

उक्त प्रेसनोट आपल्या दैनिकात प्रसिध्दीस दयावी हि विनंती .

जनसंपर्क अधिकारी
सोलापूर महानगरपालिका